देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बॅक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५०फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com
www.shreejyotiba.com

## सूचनापत्र

देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांना देवस्थान फंडावर ' धर्मशास्त्र मार्गदर्शक ' नियुक्ती करणेकामी www.mahalaxmikolhapur.com व www.shreejyotiba.com या वेबसाईटवर संपूर्ण मसूदा व नमूना अर्ज दि. ०४/०२/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आलेली होता. सदर जाहिरातीस ७ दिवसांची मुदतवाढ देणेत आली होती. या निवड प्रक्रियेतील नियम व अटी पूर्ण होत नसल्यामुळे सदर पक्रिया पुन्हा नव्याने राबविणेत येत आहे. यामध्ये जेवढे ही पात्र उमेदवार येतील त्यामधूनच निवड करण्यात येईल. इच्छुक उमेदवारांनी या माहितीस अनुसरुन या जाहिरात दिनांकापासून ७ दिवसाच्या आत सर्व कागदपत्रासह संपूर्ण माहिती भरलेले अर्ज दाखल करावे. नमूद दिनांकानंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. नियुक्तीसंबधी सर्वस्वी अधिकार जिल्हाधिकारी कोल्हापूर तथा प्रशासक देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांनी राखून ठेवले आहेत. जाहीरातीत होणारे बदलही याच संकेतस्थळांवर उपलब्ध राहतील व सर्व अर्जदारांनी त्याची नोंद स्वत:हून घ्यावी.

सही/-
सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती,
पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर.

**धर्मशास्त्र मार्गदर्शक (सहाय्यक व्यवस्थापक) पदासाठी लागणारी किमान पात्रता खालीलप्रमाणे**

१.उमेदवार किमान १० वी पास असणे आवश्यक

२.उमेदवारास धर्मशास्त्र,वेद,आगमशास्त्र,पुराण,यज्ञकर्म इत्यादी विषयांमध्ये उत्तम ज्ञान असणे आवश्यक

३.उमेदवारास किमान षोडश संस्कारांचे ( सोळा संस्कार) ज्ञान असणे आवश्यक

४.उमेदवारास देवस्थानांविषयी परंपरेने चालणा-या पुजा पध्दतींचे ज्ञान असावे.

५.उमेदवारास संस्कृत भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक

६.उमेदवाराकडे शासनमान्य वैदिक पाठशाळेचे नोंदणीकृत प्रमाणपत्र किंवा धर्मशास्त्रातील पदवी आवश्यक

७. उमेदवाराने यापूर्वी देवस्थान विषयामध्ये तज्ञ म्हणून काम केलेला पूर्वानुभव असावा.

८. वैदिक स्कुल किंवा परंपरेतून आलेल्या स्थानिक उमेदवारास प्राधान्य देणेत येईल.

९. उमेदवार हा चारित्र्यसंपन्न व निर्व्यसनी हवा.

१०. आवश्यकतेनुसार देवस्थान समितीच्या मंजुरीने वाढ /घट करता येईल.

**धर्मशास्त्र मार्गदर्शक (सहाय्यक व्यवस्थापक) पदासाठी निश्चित केलेली उद्दीष्टये खालीलप्रमाणे**

१.श्री.पुजकास उत्तम वेदोक्त व आगमोक्त ज्ञान देवून, पुरोहित घडवणे. याकरिता वेदपाठशाळेसारखे उपक्रम सहभागी करुन घेणे.

२.श्री.पुजकाकडून नित्य वेदाध्ययन व घनपाठ यांचा सराव करुन घेणे.

३.श्री.पुजकांमार्फत श्री.देवीचे ' पाकगृह ' यांचे व्यवस्थापन विविध पुजाद्वारे शास्त्रोक्त पध्दतीने नेवैद्यपध्दती पाहण्याविषयी ज्ञान देणे.

४. श्री.पुजकामार्फत श्री.देवीचे तेज (गुप्तकला) वाढविण्याबाबत विधी शिकवणे.

५. या वेदपाठशाळेचे व्यवस्थापन करताना नित्यवर्ग चालवून त्यासाठी विविध तीर्थस्थळांहून वैदिकांना, आगमाचार्यांना, पंडितांना बोलावून त्यांचे मार्गदर्शन घडवणे.

६. नवरात्रौत्सव काळामध्ये अशा विद्यार्थ्यांच्या वैदिक वेदपठन स्पर्धा घेऊन वैदिक विद्यांचे पुनरुत्थान करणे व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करुन वेगवेगळया विषयांतर्गत गुणवंतांना सन्मानित करणे.

७.या वेदपाठशाळेसाठी लागणा-या प्राचीन धार्मिक ग्रंथाचे संग्रहन करुन श्री.करवीर निवासिनी प्राचीन ग्रंथालय उभा करुन ते समृध्द करणे.

८. या ग्रंथालयासाठी सोबतच श्री.करवीर निवासिनी अध्यासन केंद्र निर्माण करुन, त्यातील ज्ञानाचा लाभ भारतीय व अभारतीय संशोधकांना घडावा या हेतूने समितीमार्फत एक वैश्विक पाऊल उचलण्यात येत आहे त्यास तज्ञ मार्गदर्शन करणे.

९.या अध्यासन केंद्रामध्ये करवीर निवासिनीवर झालेले शोधप्रबंध (पीएचडी), पुस्तके,इलेक्ट्रॉनीक ध्वनीफीत व दृकश्राव्य साधने, शिलालेख शोधनिबंध, पुरात्वीय रिपोर्टस इ. प्रतींचा संग्रह करणे. यामध्येसुध्दा श्री.करवीर निवासिनी सबंधित विषयांचे ज्ञान असलेल्या प्राध्यापकांचे व इतिहास संशोधकांचे विद्यापीठस्तरीय सेमीनारचे आयोजन करणे.

१०.याखेरीज श्री.देवीच्या वेगवेगळया उत्सावांकरिता पारंपारिक व धार्मिक महत्व असणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनासाठी वाहनकक्ष उभारणे व त्यामध्ये विविध धातूंच्या वाहनांचा संग्रह करणे ( उदा. गरुडवाहन, सिंहवाहन, रथवाहन, नंदीवाहन, चंद्रवाहन इ. ) याची जबाबदारी सांभाळणे.

११.या वाहनकक्षासोबत देवीच्या नित्योपयोगी भांडयांचाही संग्रह करणे.

१२.श्री.करवीर निवासिनीस नित्य व कायम लागणा-या पुष्पहार वनस्पतींची व धान्यांची निर्मिती श्री.देवीस असलेल्या इनाम शेत जमिनीतून सेंद्रीय पध्दतीने करण्यास शेतक-यांना प्रोस्ताहन व प्रबोधन करणे, बाजारातून अन्न उपलब्ध करण्यापेक्षा देवीच्या इनाम जमिनीतून पाहिजे तसे अन्न व वनस्पती देवस्थान समितीस कशाप्रकारे उपलब्ध करुन घेता येईल. याकरिता मार्गदर्शन करणे.

१३.श्री.देवीच्या नित्यवस्त्रांपैकी कोणती वस्त्रे निवडावीत याचेही मार्गदर्शन नवनियुक्त पुजा-यांना करणे.

१४.श्री.करवीर निवासिनी दर्शनाकरिता येणा-या भाविकांची संख्या अगणित आहे. या भक्तांचा अर्पणभाव लक्षात घेता, तो ही मोठा आहे. यासाठी देवी मंदिर प्रकारामध्ये एका भव्या धातूच्या तुलेची निर्मिती करावी. ज्याद्वारे भक्त आपली तुला करुन त्या वस्तू श्री.करवीर निवासिनीस अर्पण करतील. ( उदा. रजततुला, सुवर्णतुला, धान्यतुला इ.) याबाबतच्या धार्मिक कृत्याची जबाबदारी पाहणे.

१५.वेगवेगळया देवस्थानांचे आपल्या देवस्थानांशी सांस्कृतिक करार करुन व घडवून भारतीय संस्कृतींचे जतन आणि संवर्धनात भर लावणे.व देवस्थानच्या धार्मिक उत्सवांचे महत्व वाढविण्याविषयी प्रयत्न करणे.

१६. या सर्व गोष्टींचा व्यावहारिक भाग पाहून देवस्थान समितीचे उत्पन्न या माध्यमातून कसे वाढेल हे काळजीपर्वूक व संशोधनाद्वारे समितीस पटवून देणे.

१७. श्री.करवीर निवासिनीसाठी देवस्थान समितीची एक घटना यापूर्वीच घटीत झाली आहे. पण गर्भगृहासाठी एक विशेष घटनानिर्मिती करावी यासाठी संशोधन करणे. व याबाबत समितीस शिफारसी सादर करणे.

१८. श्री.करवीर निवासिनी विषयक अभ्यासपूर्ण प्रकाशने प्रकाशीत करणे ( उदा. श्री.करवीर निवासिनी सहस्त्रनाम, करवीर महात्म्य, करवीरतीर्थ यात्रा प्रकाश, केदारविजय, श्री.करवीर निवासिनी पुजा पध्दती ) बाबत तज्ञ मार्गदर्शन करणे.

१९. श्री.करवीर निवासिनी देवीची नित्य कार्यक्रमपत्रिका प्रसारित व प्रकाशित करणे.

२०. सेवेच्या अटी व शर्ती वरील संकेतस्थळावर त्या उपलब्ध आहेत. सदर जाहिरातीद्वारे केवळ एकच उमेदवार निवडण्यात येईल. सदरील पद हे अव्वल कारकून दर्जास ( ७ व्या वेतनआयोगानुसार एस-८- C.N.१-२५५०० ) सर्व अर्थाने समकक्ष परंतू एकल पद समजण्यात येईल. शासनाचे या आधी व यानंतर घोषित होणारे सर्व नियम व मार्गदर्शक सूचना निवडलेल्या उमेदवारास लागू राहतील.

**मा.प्रशासकसो**
**यांचे मंजूरीने**

Shivangh
नाराशंस
**सचिव**
**देवस्थान व्यवस्थापन समिती,**
**पश्चिम महाराष्ट्र,कोल्हापूर.**

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर कडे
## धर्मशास्त्र मार्गदर्शक ( सहाय्यक व्यवस्थापक ) नियुक्त करणेबाबत
## नमुना अर्ज

| अ.नं | कागदपत्र | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नांव | |
| २ | पत्ता | |
| ३ | कायमचा पत्ता | |
| ४ | आधार क्रं. | |
| ५ | संपर्क क्रं.( मोबाईल /फोन क्रं) | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | देवस्थानच्या पारंपारिक चालीरितीचे ज्ञान | आहे /नाही |
| ८ | धर्मशास्त्र,वेद,आगमशास्त्र,पुराण, यज्ञकर्म इत्यादी विषयांमध्ये उत्तम ज्ञान | आहे /नाही |
| ९ | देवस्थान विषयक कामाचा अनुभव | आहे /नाही |

**स्थळ -**

**दिनांक -** **स्वाक्षरी**

**नांव**

प्रति,
मा.प्रशासकसो,
देवस्थान व्यवस्थापन समिती,
पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर

**विषय :-** देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर कडे धर्मशास्त्र मार्गदर्शक नियुक्त करणेबाबत.

**संदर्भ :-** आपले सुचनाफलकावरील दि. ------------------ धर्मशास्त्र मार्गदर्शक पदाच्या नियुक्तीची जाहिरात

देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूरकडे धर्मशास्त्राचे मार्गदर्शक नियुक्ती करणेकामी दैनिक महासत्ता इचलकरंजी व दैनिक सिंधुदूर्ग समाचार कोल्हापूर या दैनिकामध्ये सूचनापत्र प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार आम्ही आपले कार्यालयाकडे सूचनाफलकावरील प्रसिध्द करणेत आलेल्या धर्मशास्त्र मार्गदर्शक या पदाच्या नियुक्तीसाठीचा मसुदा संपूर्ण वाचला असून, त्यातील नमूद केलेल्या पात्रतेस मी पात्र होत असून मसूद्यामधील नमूद उद्दिष्टे पूर्ण करणेस मी सक्षम आहे. आवश्यक सर्व कागदपत्रे खालील यादीतील अनुक्रमानेच पृष्ठांकन करुन जोडलेली आहेत. तसेच ती सत्यप्रत करुन दिलेली आहेत.

**सोबत** - १. नमुना अर्ज ( पान क्रं.१ )

२. आधार कार्डची प्रत - पान क्रं.२

३. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र - उत्तीर्णतेच्या सर्व कागदपत्रांच्या प्रतिसह (पान क्रं.------ ते ------)

४. वैदिक ज्ञानाचे प्रमाणपत्रे - उत्तीर्णतेच्या सर्व कागदपत्रांच्या प्रतिसह (पान क्रं.------ ते ------)

५. चारित्र्य दाखला/हमीपत्र (विहीत नमुन्यात स्टॅम्प पेपरवर ) (पान क्रं.------ ते ------)

६. षोडश संस्कारांचे ( सोळा संस्कार ) ज्ञान - उत्तीर्णतेच्या सर्व कागदपत्रांच्या प्रतिसह (पान क्रं.----- ते -----)

७. जाहिरातीप्रमाणे इतर कागदपत्रे प्रती (पान क्रं.------ ते ------)

**स्थळ -**

**दिनांक -** **स्वाक्षरी**

**नांव -**